**2 री बिमस्टेक बंदर शिखर परिषद, विशाखापट्टणम (14-15 जुलै 2025)**

16 जुलै 2025

भारताच्या वतीने 2 ऱ्या बिमस्टेक बंदर परिषदेचे आयोजन 14-15 जुलै 2025 रोजी विशाखापट्टणम येथे करण्यात आले होते. या परिषदेचा विषय "भविष्याची दिशा: नील अर्थव्यवस्था, नवोपक्रम आणि शाश्वत भागीदारी" हा होता. या परिषदेचे उद्घाटन श्री. सर्वानंद सोनोवाल (मंत्री- बंदरे, जहाज वाहतूक आणि जलमार्ग) यांच्या हस्ते पार पडले. या परिषदेत बिमस्टेक सदस्य राष्ट्र, अधिकारी, सागरी तज्ज्ञ, बंदर अधिकारी, खासगी क्षेत्र धुरीण आणि प्रादेशिक विकास भागीदार यांचा सहभाग परिषदेत दिसून आला.

2. या परिषदेत विविध विषयांवर चर्चा पार पडली. ज्यामध्ये सीमाशुल्क प्रक्रियांमध्ये सुसंवाद आणि आंतर-प्रादेशिक व्यापाराला चालना देण्यासाठी लॉजिस्टिक साखळीत वाढ, बंदरांसोबत औद्योगिक क्षेत्र संलग्नता, क्रूझ पर्यटन, डिजिटल एकीकृतता, सागरी कामगारांच्या कौशल्यात वाढ, उद्योग-शैक्षणिक संबंध, हरित शिपिंग इत्यादी विविध मुद्द्यांचा अंतर्भाव होता.

3. भारताने नेबरहूड फर्स्ट धोरणाच्या अनुषंगाने घेतलेला पुढाकार बंगालच्या उपसागर क्षेत्रात सागरी सहकार्य आणखी मजबूत करेल.

विशाखापट्टणम

14 जुलै 2025